आज दिनांक १८।६।२०१८ रोजी दुपारी ५.०० वाजता महाविद्यालय विकास समितीची सभा संस्थेच्या कार्यालयात संपन्न झाली सभेला खालील सभासद उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1] डॉ. आर. डी भोयर | अध्यक्ष | [signature] |
| 2] डॉ ए. व्ही वेरुळकर | | A.V.Verulkar |
| 3] डॉ. एस. एस कानोडे | सचिव | [signature] |
| 4] डॉ बी. पी. दैसास | | [signature] |
| 5] डॉ के. एन. पठाडे | | [signature] |
| 6] डॉ व्ही. एन. निकोसे | | [signature] |
| 7] डॉ. ए. डी रिपने | | [signature] |
| 8] प्रा. ए. एन पाटील | | AN Patil |
| 9] श्री. एम यु. चोरे | | [signature] |
| 10] श्री. ए. डी मेंढे | | [signature] |
| 11] डॉ. एस धनवटे | | [signature] |
| 12] श्री. विजय सिडाम | | [signature] |
| 13] श्री पराग दांडगे. | | [signature] |

PAGE No. DATE

ठराव क्रं. १

विषय क्रं.१

<u>मागील सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे</u>

समितीचे सचिव यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचुन दाखविले त्यावर साधक बाधक चर्चा होवुन सर्वानुमते मंजूर देण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

ठराव क्रं. २.

विषय क्रं. २ –

<u>आभार प्रस्ताव सादर करणे</u>

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापिठ अधिनियम २०१६ कलम ९७(१) नुसार नविन समिती गठीत करण्यात आली आणि या समितीमध्ये नवनिर्वाचीत सदस्याचे स्वागत व त्याचे आभार मानण्यात आले यासंबंधी सर्व सदस्यांनी विषयाचे स्वागत करुन प्रस्तावाला मंजुरी दिली

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रं.३

ठराव क्रं. ३.

<u>नवीन तुकडीचे प्रस्ताव सादर करणे</u>

विद्यार्थ्याची वाढती संख्या लक्षात घेता बी.ए., बी.कॉम व बी.एस्सी ची एक-एक तुकडी वाढविणे आवश्यक आहे तसेच एम कॉम सुरु करणे आवश्यक आहे असा विषय प्राचार्य एस काळोडे यांनी सभेत मांडला त्यावर साधक बाधक चर्चा होवुन सर्वानुमते संमती देण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रं.४

ठराव क्रं.४

अध्यापनात नवीन तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यासाठी चर्चा

PAGE No. DATE

नॅक समितीद्वारे दिलेल्या सुचना व वर्तमान स्थिती बघता अध्यापनात नविन तंत्रज्ञाचा वापर करणे अनिवार्य आहे त्याकरिता लागणारी नवीन-नवीन साधन सामुग्री व यंत्रणा महाविद्यालयात उपलब्ध करुन देण्यात यावी यासंबधी चर्चा करण्यात आली व साधन सामुग्री संग्रहीत करण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रं. ५

ठराव क्रं. ५

<u>प्रयोगशाळेतील साहित्य खरेदीबाबत चर्चा</u>.

महाविद्यालयातील विज्ञान शाखेत प्रवेशीत विद्यार्थीसंख्या लक्षात घेता नियमित प्रात्यक्षिक घेण्यासाठी आवश्यक साहित्य व केमिकल्स महाविद्यालयात उपलब्ध करणे आवश्यक आहे ही बाब श्री पहाडे यांनी उपस्थित केली त्यावर चर्चा होवुन प्रत्येक विभागातर्फे लागणाऱ्या साहित्याची यादी मागविण्याचे व त्याबद्दल कोटेशन मागविण्याचे प्राचार्यांना सांगण्यात आले व सर्वानुमते त्याला मान्यता देण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं. ६

ठराव क्रं. ६

<u>मा. अध्यक्षाच्या अनुमतीने वेळेवर येणारे विषय</u>

मा. अध्यक्षाच्या अनुमतीने वेळेवर उपस्थित केलेल्या विषयावर साधक-बाधक चर्चा होवुन सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

[signature]

अध्यक्ष

President / Secretary
Vidyabharati Sanstha,
Wardha.

[signature]

सचिव.

आज दिनांक २३/०३/२०१८ रोजी दुपारी ४ वाजता महाविद्यालय विकास समितीची सभा संस्थेच्या कार्यालयात संपन्न झाली. सभेला खालील सभासद उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1] डॉ. आर. डी. भोयर | अध्यक्ष | [signature] |
| 2] डॉ. ए. व्ही. वेकळकर | | [signature] |
| 3] डॉ. एस. एस. कानोडे | सचिव | [signature] |
| 4] डॉ. डी. पी. धैसास | | [signature] |
| 5] डॉ. के. एन. पठाडे | | [signature] |
| 6] डॉ. व्ही. एन. निकोसे | | [signature] |
| 7] डॉ. ए. डी. टिपले | | [signature] |
| 8] डॉ. ए. एन. पाटील | | [signature] |
| 9] डॉ. एम. यु. चोरे | | [signature] |
| 10] श्री ए. डी. मोहे | | [signature] |
| 11] डॉ. एस. धनवरे | | [signature] |
| 12] डॉ. विजय सिडाम | | [signature] |
| 13] श्री पराग दोडगे. | | [signature] |

विषय क्र १ — ठराव क्रं १

मागील सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे

समितीचे सचिव डॉ कानोडे यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचुन दाखविले त्यावर साधक बाधक चर्चा होवून सर्वानुमते संमती देण्यात आली

ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्र.२ :— ठराव क्रं.२

अंदाजपत्रकाचा आढावा घेणे—

नवीन सत्रात महाविद्यालयाचे आर्थिक व्यवहार चालविण्याच्या दृष्टीने अपेक्षित खर्च व प्राप्ती यासंबंधी अंदाजपत्रक सादर करण्यात आले त्यावर सर्व सदस्यांची चर्चा होवून काही दुरुस्ती ~~सुक~~ सुचविण्यात आल्या आणि नवीन अंदाजपत्रकाला मंजुरी प्रदान करण्यात आली

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं.३ — ठराव क्रं ३

नवीन अभ्यासक्रम एम कॉम व अतिरिक्त तुकडीसाठी प्रस्ताव सादर करणे—

सेलू तालुक्यातील विद्यार्थ्यांची गरजा लक्षात घेता एम कॉम सुरु करण्यात यावे असे डॉ घैसास यांनी सभेत विषय मांडला त्याला प्रा पाटील यांनी अनुमोदन दिले व सर्वानुमते नवीन अभ्यासक्रमासाठी प्रस्ताव विद्यापीठात सादर करण्याचे सर्वानुमते ठरले तसेच विद्यार्थी प्रवेश क्षमता लक्षात घेता अतिरिक्त तुकडी प्रस्ताव सादर करण्याचे सर्वानुमते ठरले

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं.४ — ठराव क्रं.४

उन्हाळी परिक्षासंबंधी विद्यार्थ्यांची तयारी यावर चर्चा करणे:—

उन्हाळी परिक्षा लक्षात घेता विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम, परिक्षा फॉर्म, हॉल तिकीट यासंबंधी सभेत आढावा घेण्यात आला. साधक बाधक चर्चा होवून काही दुरुस्ती सुचविण्यात आल्या आणि सर्वानुमते संमती देण्यात आली

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं.५ — ठराव क्रं.५.

मा. अध्यक्षांच्या अनुमतीने वेळेवर येणाऱ्या विषयावर चर्चा

मा. अध्यक्षांनी उपस्थित केलेल्या विविध विषयांवर चर्चा झाली. मा अध्यक्षांनी त्यावर मार्गदर्शन केले आणि सर्वानुमते सुचविलेल्या सुचना व तरतुदींना मान्यता दिली.

ठराव सर्वानुमते मंजुर

President / Secretary
Vidyabharti Sanstha,
Wardha.

VIDYABHARTI COLLEGE SELOO

सचिव.
PRINCIPAL
Vidyabharti College, Selu

आज दिनांक ३१/८/२०१८ रोजी दुपारी ४ वाजता महाविद्यालय विकास समितीची सभा संस्थेच्या कार्यालयात संपन्न झाली. सभेला खालील सभासद उपस्थित होते.

1] डॉ. आर डी भोयर — अध्यक्ष
2] डॉ. ए. व्ही. वेकळकर
3] डॉ. एस. एस. कानोडे — सचिव
4] डॉ. बी. पी. धैसास
5] डॉ. के. एन पठाडे
6] डॉ. व्ही एन निकोसे
7] डॉ. ए. डी. टिपले
8] डॉ. ए. एन पाटील
9] श्री. एम यु. चोरे
10] श्री. ए. डी. मेहेरे
11 डॉ. एस. धानवटे
12 श्री विजय सिडाम
13] श्री. पराग दांडगे

PAGE No.
DATE

विषय क्र.१ — ठराव क्र.१

मागील सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे

सामितीच्या सचिवांनी सभेत मागील सभेचे इतिवृत्त वाचुन दाखविले त्यावर चर्चा होवुन त्याला सर्वानुमते संमती दिली — ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र.२ — ठराव क्र.२

पदमान्यतेचा प्रस्ताव सादर करणे

चालु वर्षात रिक्त पदाची नियुक्ती करण्याची गरज लक्षात घेतात सहसंचालक उच्च शिक्षण विभाग नागपूर यांचे कडे पदमान्यतेचा प्रस्ताव सादर करण्यासंबंधी ठरले. प्रस्ताव तयार करण्याची जबाबदारी श्री एम. चोरे यांना सोपविण्याचे सर्वानुमते ठरले. — ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र.३ — ठराव क्र.३

बँक सामितीकडे प्रस्ताव अहवाल सादर करणे

बँक सामितीकडुन पहाणी झाली त्यांच्या धोरणानुसार दरवर्षी AQAR पाठविण्यात येतो त्याबद्दल सभेत विषय चर्चेला आला असता IQAC समन्वयक डॉ टिपले यांनी AQAR सादर केला त्यातील मुद्दे सभेसमोर मांडले त्यावर साधक बाधक चर्चा होवुन सर्वांनी त्याला मान्यता दिली — ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र.४ — ठराव क्र.४

विद्याभारती महाविद्यालय कर्मचारी सामितीचे बँक खाते उघडण्याबाबत :-

वरील विषयाला अनुसरुन महाविद्यालय — ठराव

PAGE No.
DATE

विकास सामितीचे बँक खाते उघडण्यात यावे हे खाते "विद्याभारती मळ कर्मचारी कल्याण सामिती" या नावाने राहील या खात्याचे सर्व व्यवहार प्रॉ.संजय एस कानोडे, डॉ भा.प्र. घोसास आणि प्रा. वैभव पिंपळे या पैकी कोणत्याही दोघांच्या सहीने करण्यात यावे पण यामध्ये एक सही प्राचार्यांची असावी. हे खाते "वर्धा नागरी सहकारी बँक" शाखा सेलू येथे उघडण्यात यावे असे सर्वानुमते ठरले — सर्वानुमते मंजूर

विषय क्र.५ — ठराव क्र.५

विद्याभारती मह. माजी विद्यार्थी सामितीचे बँक खाते उघडण्याबाबत :-

वरील विषयाला अनुसरुन असे ठरले कि "विद्याभारती महाविद्यालयातील पदवी प्राप्त केलेले विद्यार्थी, माजी विद्यार्थी म्हणून महाविद्यालयाच्या प्रक्रियेत सातत्याने समाविष्ट असतात काही प्रमाणात महाविद्यालयाच्या विकासामध्ये त्यांचा हातभार देखील लागत असतो याकरिता महाविद्यालयात माजी विद्यार्थी सामिती स्थापन करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला त्यानुसार सामिती देखील स्थापन केलेली असुन या सामितीचे बँक खाते उघडण्यात यावे असे ठरविण्यात आले. खाते "विद्याभारती महाविद्यालय माजी विद्यार्थी सामिती" या नावाने राहावे. या खात्याचे सर्व आर्थिक व्यवहार प्राचार्य डॉ संजय कानोडे, डॉ पराग कावळे आणि श्री पंकज वारापात्रे यापैकी कोणत्याही दोघांच्या सहीने करण्यात यावे यात — ठराव सर्वानुमते मंजूर

प्राचार्य डॉ संजय कानोडे यांची सही असणे आवश्यक राहील व हे स्वाते "वर्धा नागरी सहकारी बँक" सेलू येथे उघडण्यात यावे असे सर्वानुमते ठरविण्यात आले

विषय क्र. ६ ठराव क्रं. ६

मा. अध्यक्षाच्या अनुमतीने वेळेवर येणाऱ्या विषयावर चर्चा

मा अध्यक्षाच्या अनुमतीने वेळेवर उपस्थित विषयांवर चर्चा झाली त्यावर अध्यक्षानी मार्गदर्शन केले आणि सुचविलेल्या सुचना व तरतुदींना मान्यता सर्व सदस्यांनी दिली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

अध्यक्ष
(डॉ आर जी भोयर)
President Secretary
Vidyabharti Sanstha,
Wardha.

VIDYABHARTI COLLEGE SELOO

सचिव
(डॉ एस एस कानोडे)
PRINCIPAL
Vidyabharti College, Seloo

आज दिनांक २५ मार्च २०१८ रोजी दुपारी ४.०० वाजता महाविद्यालय विकास समितीची सभा संस्थेच्या कार्यालयात संपन्न झाली सभेला खालील सभासद उपस्थित होते

| | | | |
|---|---|---|---|
| १) | डॉ आर जी भोयर | अध्यक्ष | [signature] |
| २) | डॉ ए. व्ही वेकळकर | सदस्य | [signature] |
| ३) | डॉ एस एस कानोडे | सचिव | [signature] |
| ४) | डॉ. भा. प्र. दैसास | सदस्य | [signature] |
| ५) | डॉ के. एन पठाडे | | [signature] |
| ६) | डॉ व्ही. एन निकोसे | | [signature] |
| ७) | डॉ ए. डी. टिपले | | [signature] |
| ८) | डॉ. ए. एन पाटील | | [signature] |
| ९) | श्री एम बु चोरे | | [signature] |
| १०) | श्री ए. डी. मेहेर | | [signature] |
| ११) | डॉ. एस टेंबवटे | | [signature] |
| १२) | श्री विनय सिडाम | | [signature] |
| १३) | श्री पराग दांडगे. | | [signature] |

PAGE No. DATE

विषय क्र.१ ठराव क्र.१

मागील सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे

समितीचे सचिव डॉ कानोडे यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचुन दाखविले त्यावर चर्चा होवून सर्वानुमते मंजूर करण्यात आले

ठराव एकमताने मंजूर

विषय क्र.२ ठराव क्र.२

अंदाज पत्रकाचा आढावा घेणे

नविन सत्रात महाविद्यालयाचे आर्थिक व्यवहार चालविण्याच्या दृष्टीने अपेक्षित खर्च व उत्पन्नासंबधी तयार केलेले अंदाजपत्रक सभेत सादर करण्यात आले त्यावर साधक बाधक चर्चा होवुन एकमताने पारीत करण्यात आले

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र.३ ठराव क्र.३

नवीन अभ्यासक्रम एम.एस.सी प्रस्ताव सादर करण्याबाबत

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची मागणी लक्षात घेता महाविद्यालयात एम.एससी (Bot & Zoo) हा नवीन अभ्यासक्रम सुरु करावा असा प्रस्ताव डॉ पठाडे यांनी सभेत मांडला त्यावर आवश्यक ती चर्चा होवुन विद्यापिठाकडे प्रस्ताव सादर करावा असे सर्वानुमते ठरले

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र.४ ठराव क्र.४

नॅक समितीकडे वार्षिक AQR सादर करण्याबाबत

नॅक मुल्यांकन झाल्यानंतर दरवर्षी AQR नॅक समितीकडे सादर करावा लागतो यासंबंधी NAAC co-ordinator डॉ टिपले यांना विचारपुस करुन तो अहवाल अंतिमरित्या नॅक समितीकडे सादर करण्याबाबत सर्व सदस्यांनी संमती दर्शविली.

ठराव सर्वानुमते मंजूर

PAGE No. DATE

विषय क्र.५ ठराव क्र.५

स्थान निश्चिती संबधी प्रस्ताव सादर करणे

महाविद्यालयातील प्राध्यापक जे वरिष्ठ श्रेणी प्राप्त करण्यासाठी पात्र आहेत त्याचे प्रस्ताव सहसंचालक उच्च शिक्षण नागपूर व विद्यापिठाकडे सादर करण्यासंबधी प्राचार्यांना सुचना देण्यात आल्या याबद्दल सर्व सदस्यानी संमती दर्शविली

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र.६ ठराव क्र.६

प्राचार्यांचे confirmation करुन घेण्याबाबत

महाविद्यालयातील प्राचार्य यांचा कार्यकाळ ६० वर्ष पासून ६२ वर्ष करुन घेण्याच्या दृष्टीने प्रस्ताव सहसंचालकांकडे सादर करावा अशी माहीती सभेत मांडण्यात आली त्यावर सविस्तर चर्चा होवून हा प्रस्ताव सादर करण्याची जबाबदारी श्री चोरे यांना सोपविण्यात आली याला सर्व सदस्यांची संमती प्राप्त झाली

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र.७ ठराव क्र.७

मा. अध्यक्षांच्या अनुमतीने वेळेवर येणाऱ्या विषयांवर चर्चा

वरील विषयाव्यतिरीक्त महाविद्यालयातील कित्येक मुद्द्याना सदस्यांनी उपस्थित केले त्या प्रत्येक विषयावर साधक-बाधक चर्चा

ठराव सर्वानुमते मंजूर.

होवून त्या प्रत्येक विषयाला संमती दर्शविण्यात आली.

अध्यक्ष
President, Secretay
Vidyabharti Sanstha,
Wardha.

VIDYABHARTI COLLEGE SELOO

सचिव
PRINCIPAL
Vidyabharti College, Seloo

आज दिनांक १८ ऑगस्ट २०१७ रोजी दुपारी ४.०० वाजता महाविद्यालय विकास समितीची सभा संस्थेच्या कार्यालयात संपन्न झाली. सभेत खालील सभासद उपस्थित होते.

1] डॉ. आर जी भोयर अध्यक्ष
2] डॉ. एस. एस कानोडे सचिव
3] डॉ. ए. व्ही बेकळकर सदस्य
4] डॉ भा. प्र. घैसास
5] डॉ के. एन पठाडे
6] डॉ व्ही एन निकोसे
7] डॉ ए. डी टिपले
8] डॉ ए. एन पाटील
9] श्री एम यु चोरे
10] श्री ए. डी मेहे
11] डॉ एस धनवटे
12] श्री विजय सिडाम
13] श्री पराग दांडगे

| PAGE No | |
|---|---|
| DATE | |

ठराव क्रं. १.

विषय क्र. १
मागील सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे

समितीचे सचिव श्री डॉ एस कानोडे यांनी मागिल सभेचे इतिवृत्त वाचून दाखविले त्यामधील विषयांवर चर्चा घडवुन आणण्यात आली व सर्व सदस्यांनी त्याला मान्यता दिली — ठराव सर्वानूमते मंजूर

विषय क्रं. २ — ठराव क्रं. २
स्थान निश्चिती
पदमान्यतेचा प्रस्ताव सादर करण्याबाबत

महाविद्यालयातील जे प्राध्यापक वरिष्ठ श्रेणी करिता पात्र आहेत त्यांचे प्रस्ताव सहसंचालक व विद्यापिठाकडे सादर करावे असा विषय डॉ कानोडे यांनी सभेत मांडला त्यावर चर्चा होवून संबधीत प्राध्यापकाचा स्थान निश्चित प्रस्ताव सादर करण्याबाबत सर्वानूमते ठरले — ठराव सर्वानूमते मंजूर

विषय क्रं.३ — ठराव क्र.३
पदमान्यतेचा प्रस्ताव सादर करणे

दरवर्षी महाविद्यालयाचे workload लक्षात घेवुन पदमान्यतेचा प्रस्ताव सहसंचालकाकडे सादर करणे आवश्यक आहे तसा प्रस्ताव तयार करुन सादर करण्याची जवाबदारी श्री मनिष चोरे यांना सोपविण्यात आली याला सर्वसंमती प्राप्त झाली. — ठराव सर्वानूमते मंजूर

विषय क्रं.४ — ठराव क्रं.४
रिक्त पदांच्या नियुक्ती संबधी कार्यवाही करणे

विद्यापिठ आणि सहसंचालकाकडुन रिक्त पदे भरण्याची परवानगी प्राप्त झाली आहे असे प्राचार्य डॉ कानोडे यांनी सभेत सांगितले त्यानुसार रिक्त पदे भरण्यासंबंधी करावी लागणारी प्रक्रिया, जाहीरात तसेच इतर संबधीत कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरले व ही जबाबदारी प्राचार्य आणि श्री मनीष चोरे यांना सोपविण्याचे ठरले — ठराव सर्वानूमते मंजूर

| PAGE No | |
|---|---|
| DATE | |

विषय क्र.५ — ठराव क्र.५
वाणिज्य संशोधन केंद्र सुरु करण्यासंबधी प्रस्ताव सादर करणे

महाविद्यालयात एम कॉम यशस्वी रित्या सुरु झाल्याने विद्यार्थ्यांची पुढील गरज लक्षात घेता विद्यार्थ्यांना Ph.D. प्राप्त करण्याच्या दृष्टीने महाविद्यालयात संशोधन केंद्र सुरु करावे असा प्रस्ताव डॉ घैसास यांनी सभेत मांडला यावर चर्चा होवून प्रस्ताव सादर करावा असे सर्व सदस्यांनी मान्य केले व ही जबाबदारी वाणिज्य विभागाला सोपविण्यात यावी असे सर्वानूमते ठरले — ठराव सर्वानूमते मंजूर.

विषय क्रं. ६ — ठराव क्रं ६.
माजी विद्यार्थ्यांकडुन देणगी स्वरुपात रक्कम जमा करणे

माजी विद्यार्थी संघटन स्थापन करण्यात आले तसेच नागरिक बँकेत खाते देखील उघडण्यात आले आहे काही माजी विद्यार्थ्यांनी संघटन कार्यशील करण्याच्या उद्देशाने देणगी देण्याची इच्छा प्रगट केली आहे असे प्राचार्य कानोडे यांनी सभेत मांडले यावर चर्चा होण्यात आली व जे इच्छुक आहेत त्यांच्याकडुन देणगी स्वरुपात रक्कम संकलीत करुन ती बँक खात्यात जमा करण्यात यावी असे — ठराव एकमताने मंजूर

सर्वानुमते ठरले

विषय क्रं.७ ठराव क्रं.७

बी.एस भाग २ नैसर्गिक वाढीचा प्रस्ताव सादर करणे

बी.एस सी बारवेत विद्यार्थ्यांची प्रवेश घेण्याच्या संख्येत होणारी वाढ लक्षात घेता बी.एससी भाग-२ करीता नैसर्गिक वाढीचा प्रस्ताव विद्यापिठाकडे सादर करावा लागेल असे डॉ कानोडे यांनी सभेत विषय मांडला त्यावर चर्चा होवून सर्व सभासदांनी त्याला मंजूरी दिली — ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं.८ ठराव क्रं.८

मा. अध्यक्षाच्या अनुमतीने वेळेवर येणाऱ्या विषयांवर चर्चा —

मा. अध्यक्षाच्या अनुमतीने वेळेवर उपस्थित केलेल्या विषयावर चर्चा झाली आणि त्यावर अध्यक्षांनी मार्गदर्शन केले. — ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
President, Secretay
Vidyabharti Sanstha,
Wardha.

SELOO VIDYABHARTI COLLEGE

सचिव
PRINCIPAL
Vidyabharti College, Seloo

---

आज दिनांक २० मार्च 2020 रोजी दुपारी ४.०० वाजता महाविद्यालय विकास समितीची सभा संस्थेच्या कार्यालयात संपन्न झाली सभेला खालील सभासद उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १] डॉ. आर जी भोयर | अध्यक्ष | [signature] |
| २] डॉ. ए.व्ही वेकळकर | सदस्य | [signature] |
| ३] डॉ संजय एस कानोडे | सचिव | [signature] |
| ४] डॉ भा. प्र. धैसास | सदस्य | [signature] |
| ५] डॉ के.एन पठाडे | " | [signature] |
| ६] डॉ व्ही.एन निकोसे | " | [signature] |
| ७] डॉ ए.डी टिपले | " | [signature] |
| ८] डॉ. ए. एन पाटील | " | [signature] |
| ९] श्री एम यु चोरे | " | [signature] |
| १०] श्री ए डी मेघे | " | [signature] |
| ११] डॉ एस दानवरे | " | [signature] |
| १२] डॉ निलेश सिडाम | " | [signature] |
| १५] श्री पराग दांडगे | " | [signature] |

विषय क्र. १

ठराव क्र. १

मागील सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे :-

समितीचे सचिव यांना मागील सभेचे इतिवृत्त सभेस वाचून दाखविले त्यावर साधक बाधक चर्चा होवुन सर्वानुमते मंजूर करण्यात आले

ठराव क्र १ :- ठराव सर्वानूमते मंजुर

विषय क्र. २ :-

अंदाज पत्रकाचा आढावा घेणे :-

नवीन सत्रात महाविद्यालयाचे आर्थिक व्यवहार चालविण्याच्या दृष्टीने अपेक्षित खर्च व उत्पन्ना संबंधी तयार केलेले अंदाज पत्रक श्री चोरे यांनी सभेत मांडले त्यावर साधक बाधक चर्चा होवुन एकमताने मंजूर करण्यात आले.

ठराव क्र:२ - ठराव एकमताने मंजुर

विषय ३:-

नवीन अभ्यासक्रम MSC (Phy) प्रस्ताव सादर करणे

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची मागणी लक्षात घेता एम. एस सी (भौतिकशास्त्र) हा नवीन अभ्यास क्रम सुरु करावा असा प्रस्ताव सचिवांनी सादर केला त्यावर विस्तृत चर्चा होवुन वरील अभ्यासक्रमाचा प्रस्ताव सादर करण्याची जबाबदारी श्री चोरे यांना देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्र.३ :- ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र.४

नॅक समितीकडे वार्षिक AQR सादर करणे —

दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील महाविद्यालयाचा AQR नॅक समिती कडे सादर करण्यासंबधी श्री टिपले यांच्याशी चर्चा करुन अहवाल सादर करण्याचे सर्वानुमते ठरले

ठराव क्र.४ :- ठराव सर्वानूमते मंजूर

विषय क्र.५ :-

कोविड-१९ संदर्भात उद्‌भवलेल्या परिस्थीतीचा आढावा

देशात कोविड १९ चे संकट समोर असतांना महाविद्यालयातील कामकाज कसे असावे यासंबधी सभेत चर्चा होवुन उद्‌भवणाऱ्या विविध मुद्द्यावर चर्चा घेण्यात आली. आणि विविध उपाययोजना आखण्यात आल्या ज्याला सर्वांची संमती घेण्यात आली

~~विषय~~ ठराव क्र.५ — ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र. ६:- अतिरीक्त तुकडी साठी प्रस्ताव सादर करणे

महाविद्यालयातील एम कॉम भारवेला विद्यार्थ्यांची मागणी लक्षात घेता एम कॉम ची अतिरीक्त तुकडी सुरु करण्यात यावी असा विषय श्री घोसास यांनी सभेत उपस्थित केला त्यावर सविस्तर चर्चा होवुन प्रस्ताव सादर करण्याचे सर्वानुमते ठरले

ठराव क्र. ६ — ठराव एकमताने मंजूर

विषय क्र. ६
मा. अध्यक्षाच्या अनुमतीने वेळेवर येणाऱ्या विषयावर चर्चा

मा. अध्यक्षांच्या अनुमतीने वेळेवर उपस्थित केलेल्या विविध विषयावर चर्चा झाली व सर्वानुमते स्विकृती मिळाली

ठराव क्र. ६ :- ठराव सर्वानुमते मंजुर

अध्यक्ष
President / Secretary
Vidyabharti Sanstha,
Wardha.

सचिव
PRINCIPAL
Vidyabharti College, Seloo

आज दिनांक १४ ऑगस्ट २०२० रोजी दुपारी ४.०० वाजता महाविद्यालय विकास समितीची सभा आभासी पद्धतीने झाली सभेला खालील सभासद उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १] डॉ आर जी भोयर | अध्यक्ष | |
| २] डॉ ए. व्ही वेकळकर | सदस्य | |
| ३] डॉ एस. एस. कानोडे | सचिव | |
| ४] डॉ बी. पी. दौसास | सदस्य | |
| ५] डॉ के. एन. पठाडे | | |
| ६] डॉ व्ही. एन. निकोसे | | |
| ७] डॉ एड डी. टिपले | | |
| ८] डॉ ए. एन पाटील. | | |
| ९] श्री एम यु. चोरे | | |
| १०] श्री ए. डी. मेंढे | | |
| ११] डॉ एस. धनवटे | | |
| १२] श्री विजय सिडाम | | |
| १३] श्री पराग दोडगे. | | |

PAGE No
DATE

विषय क्रं.१.
मागील सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे-
सचिव डॉ कानोडे यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचुन दाखविले त्यावर साधक-बाधक चर्चा होवुन सर्व सदस्यांनी मान्यता दिली.

ठराव क्र.१:- ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रं.२:-
पदमान्यतेचा प्रस्ताव सादर करणे-
दरवर्षी सहा. संचालक शिक्षण विभाग नागपूर यांच्याकडे महाविद्यालयातील प्रवेशीत विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेवुन work load तयार करुन पदसंख्या निश्चित करण्याच्या दृष्टीने प्रस्ताव सादर करावा लागतो. यावर सर्व सदस्यांमध्ये चर्चा होवुन प्रस्ताव तयार करण्याची जबाबदारी श्री मनिष चोरे यांना सोपविण्याचे सर्वानुमते ठरले. आणि जबाबदारी सोपविण्यात आली-

ठराव क्रं.२:- ठराव सर्वानुमते मंजूर-

विषय क्रं.३:-
अंकेक्षण अहवालाला मान्यता देणे:-
आर्थिक वर्ष २०१९-२० चा अंकेक्षण वरिष्ठ लिपीक श्री चोरे यांनी वाचन केले त्यावर साधक बाधक चर्चा होवुन अहवालाला सर्व सदस्यांनी स्विकृती दिली.

ठराव क्रं.३ - ठराव सर्वानुमते मंजूर

PAGE No.
DATE

विषय क्रं.४:- पदमान्यतेचा प्रस्ताव सादर करणे.
दरवर्षी प्रवेशीत विद्यार्थ्यांची संख्या लक्ष्यात घेवुन workload निर्धारित करुन तयार होणाऱ्या पदाकरिता पदमान्यता प्रस्ताव सहसंचालक उच्च शिक्षण विभाग नागपूर येथे सादर करणे आवश्यक आहे हा मुद्दा चर्चेला आला असता सर्वानुमते प्रस्ताव तयार करुन सादर करण्याची जबाबदारी श्री चोरे यांना सोपविण्याचे सर्वानुमते ठरले.
ठराव क्रं.४- ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रं.५:- प्रयोग शाळेतील साहीत्य खरेदी करण्याबाबत
महाविद्यालयात MSc सुरु झाल्याने प्रयोग शाळेत त्यादृष्टीने उपकरणे, केमिकल्स, प्रयोग साहित्य असणे आवश्यक आहे असे श्री पराडे यांनी सुचविले त्यावर चर्चा होवुन संबधीत विभाग प्रमुखांना सुचना देवुन Requirement List मागुन घेणे व ते साहीत्य खरेदी करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे ही जबाबदारी डॉ. कानोडे यांना सर्वानुमते सोपविण्यात आली.

ठराव क्रं.५:- ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं.६ - वाणिज्य रिसर्च सेंटर संबधी आढावा घेणे-
वाणिज्य विभागाद्वारे रिसर्च सेंटर करिता प्रस्ताव सादर करण्यात आला असुन विद्यापिठाकडुन कमिटी लावण्यात आली किंवा नाही यासंबधी डॉ. हेंसास यांनी सभेत माहीती सादर केली त्यानुसार

तयारी करण्यासंबंधी विभागाला सुचना देण्यात आल्या

ठराव क्रं.६:- ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रं.७:- पुस्तक खरेदी संबंधी चर्चा करणे-
महाविद्यालयात नविन कोर्सेस सुरु झाले शिवाय अभ्यासक्रमात बदल त्यामुळे अद्यावत अभ्यासक्रमाची पुस्तके खरेदी करणे आवश्यक आहे अशी सुचना डॉ पठाडे यांनी दिली त्यावर चर्चा होवुन प्रत्येक विभाग प्रमुखांकडुन नविन पुस्तकाची यादी मागुन ती खरेदी करण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रं.७:- ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्रं.८:- फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम राबविण्या बाबत चर्चा करणे:-
शिक्षण क्षेत्रात नवीन-नवीन तंत्रज्ञान येत आहे त्या तंत्रज्ञानापासुन आपल्या कडील प्राध्यापक तयार होवुन त्याचा अवलंब करण्याच्या दृष्टीने महाविद्यालयात फॅकल्टीकरिता डेव्हलपमेंट प्रोग्राम राबविला पाहीजे असे डॉ टिपले यांनी सभेला सुचविले यावर चर्चा होवुन एखादा फॅकल्टी डेव्हलमेंट प्रोग्राम राबविण्याचे सर्वानुमते ठरले

ठराव क्रं.८:- ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्र ९:- मा. अध्यक्षाच्या अनुमतीने वेळेवर येणाऱ्या विषयांवर चर्चा.
मा. अध्यक्षांनी तसेच सदस्यांनी सभेत वेगवेगळ्या उपस्थित केलेल्या विषयावर चर्चा झाली. मा. अध्यक्षांनी प्रत्येक विषय हाताळतांना सदस्यांना मार्गदर्शन केले व विविध प्रकारच्या सुचना दिल्या. सर्व सदस्यांनी त्यावर संमती दर्शविली

ठराव क्रं.९:- ठराव सर्वानुमते मंजूर.

(स्वाक्षरी)
अध्यक्ष
President / Secretary
Vidyabharti Sanstha,
Wardha.

(स्वाक्षरी)
सचिव
PRINCIPAL
Vidyabharti College, Seloo

VIDYABHARTI COLLEGE SELOO

आज दिनांक २४.एप्रील.२०२१ रोजी दुपारी ४.०० वाजता महाविद्यालय विकास समितीची सभा आभासी पद्धतीने संपन्न झाली सभेला खालील सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १] | डॉ. आर जी भोयर | अध्यक्ष |
| २] | डॉ ए.व्ही वेकळकर | सदस्य |
| ३] | डॉ. एस. एस. कानोडे | सचिव |
| ४] | डॉ बी. पी. घैसास | सदस्य |
| ५] | डॉ. के. एन पठाडे | " |
| ६] | डॉ. व्ही. एन निकोसे | " |
| ७] | डॉ. ए. डी. टिपले | " |
| ८] | डॉ. ए. एन पाटील | |
| ९] | प्रो. एम. यु. चोरे | |
| १०] | प्रो. ए. डी. मेघे | |
| ११] | डॉ एस. धनवटे | |
| १२] | प्रो. विजय सिडाम | |
| १३] | प्रो. पराग दांडगे | |

विषय क्रं.१:- मागील सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे

सामितीचे सचिव डॉ संजय कानोडे यांनी मागील सभेच्या इतिवृत्ताचे वाचन केले. त्यावर साधक-बाधक चर्चा होवुन सर्व सदस्यांनी स्विकृती प्रदान केली.

ठराव क्रं.१:- ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं.२:- सत्र 2020-21 महाविद्यालयीन निकालावर चर्चा करणे:-

विद्यापिठाकडुन घोषीत झालेल्या निकाला-संबधी डॉ. संजय कानोडे यांनी सभेत माहीती दिली. निकालासंबधी चर्चा होवुन निकाल वाढविण्यावर भर देण्यात यावा अशा सुचना अध्यक्षाद्वारे सभेत देण्यात आल्या.

ठराव क्रं.२:- ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं.३:- सत्र 2021-22 प्रवेश प्रक्रियेवर चर्चा करणे:-

कोविड-१९ ची परिस्थीती लक्षात घेता सत्र २०२१-२२ करिता विद्यार्थ्यांना प्रवेश देण्या-करिता कोणत्या पध्दतीचा अवलंब करावा यावर चर्चा झाली. प्रवेश प्राक्रिया राबविण्या-करिता ऑन लाईन पद्दतीचा वापर करुन google Formate मध्ये ॲडमिशन फॉर्म तयार करुन विद्यार्थ्यांकडुन भरुन घ्यावा या मुद्द्यावर सदस्यांनी संमती दर्शविली.

ठराव क्रं.३:- ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं.४:- सत्र 2021-22 च्या अंदाजपत्रकावर चर्चा करणे:-

महाविद्यालयीन प्रशासन व्यवस्थित चालण्या-च्या दृष्टीने सत्र 2021-22 चे तयार केलेले अंदाज पत्रक श्री मनीष चोरे यांनी सभेत सादर केले. त्यावर साधक-बाधक चर्चा झाली काही घटकांवर सदस्यांनी दुरुस्त्या सुचविल्या त्यावर देखील चर्चा होवुन नविन अंदाजपत्रक तयार करुन त्यामध्ये समावेश करण्यात यावा असे श्री चोरे यांना सुचविण्यात आले.

ठराव क्रं.४:- ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्रं.५:- रोस्टर प्राक्रिया राबविण्यावर चर्चा करणे:-

महाविद्यालयातील रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने शासन नियमानुसार Roster अद्यावत करणे आवश्यक आहे आणि ते विद्यापिठातुन व समाजकल्याण विभागातुन पारीत करणे आवश्यक आहे अशी माहीती श्री कानोडे यांनी सभेला दिली त्यावर चर्चा होवुन रोस्टर तयार करण्याची जवाबदारी श्री चोरे यांना सोपविण्या-चे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रं.५:- ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्रं.६:- "विद्याभारती कॉलेज कॉमर्स रिसर्च सेंटर सेल" या नावाने बॅक खाते उघडण्याबाबत

वरील विषयाला अनुसरुन विद्याभारती कॉलेजला रा.तु.म नागपूर विद्यापिठ नागपूर द्वारा "कॉमर्स रिसर्च सेंटर" ला मान्यता प्रदान केली असुन या सेंटर मध्ये Ph.D. प्राप्त करण्याच्या दृष्टीने विद्यार्थी प्रवेश घेतील त्या विद्यार्थ्यांसोबत तसेच विद्यापिठासोबत आर्थिक व्यवहार करण्याच्या

दृष्टीने बॅंक खाते असावे असा मुद्दा डॉ घैसास यांनी सभेत उपस्थित केला त्यावर साधक-बाधक चर्चा होवून वर्धा नागरी सहकारी अधिकोष वर्धा (मर्या) शाखा सेलू येथे चालू खाते उघडण्यात यावे आणि या खात्यातील व्यवहार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ भास्कर प्र. घैसास आणि रिसर्च सेंटर चे समन्वयक डॉ सिध्दार्थ मा. नागदिवे यांच्या संयुक्त सहीने करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रं. ६:- ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्रं. ७:- नॅक समितीकडे वार्षिक AQR संबधी चर्चा

दरवर्षी नॅक समिती कडे वार्षिक AQR मार्च-एप्रील मध्ये सादर करावयाचा असतो. त्यामुळे यावर्षीचा AQR सादर केला किंवा नाही यावर नॅक समितीचे समन्वयक श्री डॉ. टिपले यांना विचारणा करण्यात आली. त्यांनी सभेला AQR सादर केल्याची माहीती दिली

ठराव क्रं. ७:- ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्र. ८:- कोविड-१९ संबधी जागृती निर्माण करण्यावर चर्चा करणे :-

मागील वर्षापासुन कोरोना सारख्या महामारीचा सामना सर्व जग करीत आहे महाविद्यालयातर्फे जनजागृती संदर्भात कोणकोणते उपक्रम राबविण्यात आले यासंबधी महाविद्यालयाने कार्य केले याचा आढावा घेण्यात आला आणि भविष्यात आणखी कोण कोणते उपक्रम राबवु शकतो यावर चर्चा झाली.

ठराव क्र. ८ :- ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्रं. ९:- मा. अध्यक्षाच्या अनुमतीने वेळेवर उपस्थित विषयावर चर्चा करणे :-

सभेत विवीध विषयांवर चर्चा झाल्यानंतर वेळेवर सदस्यांनी उपस्थित केलेल्या विषयावर चर्चा घेण्यात आली तसेच मा. अध्यक्षांनी प्रत्येक विषयाचे महत्व पटवुन दिले व मार्गदर्शन केले.

ठराव क्रं. ९ – ठराव सर्वानुमते मंजुर

अध्यक्ष
President Secretay
Vidyabharti Sanstha,
Wardha.

सचिव
PRINCIPAL
Vidyabharti College, Seloo
& Sci. College, SELOO

आज दिनांक ०५/०८/२०२१ रोजी दुपारी ४.०० वाजता महाविद्यालय विकास समितीची सभा संस्थेच्या कार्यालयात संपन्न झाली. सभेत खालील सभासद उपस्थित होते

1] डॉ आर डी भोयर — अध्यक्ष

2] डॉ एस. एस कानोडे — सचिव

3] डॉ ए. व्ही वेकळकर — सदस्य

4] डॉ बी पी. धैसास — "

5] डॉ. के. एन पठाडे

6] डॉ व्ही एम निकोसे

7] डॉ. ए. डी टिपले

8] डॉ ए. एन पाटील

9] श्री. एम यु. चोरे

10] श्री. ए. डी मेघे

11] डॉ. एस धनवटे

12] श्री विजय सिडाम

13] श्री पराग दांडगे

विषय क्रं.१ :- मागील सभेचे इतिवृत वाचुन कायम करणे
सामितीचे सचिव डॉ. कानोडे यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचुन दाखविले त्यावर साधक-बाधक चर्चा होवुन सर्वानुमते त्याला मान्यता प्रदान करण्यात आली.

ठराव क्र.१ :- ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं.२ :- सत्र 2021-22 करिता प्रवेश प्रक्रियेवर चर्चा
सत्र 2021-22 या वर्षाकरिता महाविद्यालयात विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याच्या दृष्टीने कशा प्रकारची व्यवस्था करण्यात आली याचा आढावा सभेत घेण्यात आला प्रवेश प्रक्रियेतील विविध समस्यावर चर्चा करण्यात आली व त्यावर उपाय देखील सुचाविण्यात आले.

ठराव क्रं.२ :- ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं.3 :- महाविद्यालयीन निकालाचा आढावा घेणे
सत्र 2020-21 मधील विद्यार्थ्यांचा परिक्षेचा निकाल यावर चर्चा करण्यात आली निकाल समाधानकारक असल्याचे सर्व सदस्यांनी सुचविले आणि प्राचार्य व प्राध्यापकांचे आभार मानले व अभिनंदन केले.

ठराव क्रं.3 :- ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं.४ पुस्तके खरेदीबाबत चर्चा करणे :-
महाविद्यालयात नवीन नवीन कोर्सेस सुरु झाले, वाणिज्य संशोधन केंद्र सुरु झाले त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी आवश्यक पुस्तके ग्रंथालयात असणे आवश्यक आहे असे डॉ. घैसास यांनी सभेत सुचविले त्यावर चर्चा होवुन प्रत्येक विभागाकडुन पुस्तकाची यादी मागवुन ती पुस्तके खरेदी करण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रं.४ :- ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं.५ :- प्रयोगशाळा साहीत्य खरेदी करण्याबाबत चर्चा करणे :-
महाविद्यालयात MSC कोर्सेस सुरु झाले त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रक्टीकल करण्याच्या दृष्टीने प्रयोगशाळेत यंत्रसामुग्री, साहीत्य, केमिकल्स मुबलक प्रमाण उपलब्ध असणे आवश्यक आहे ही बाब डॉ. पठाडे यांनी सभेत सदस्यापुढे मांडली त्यावर चर्चा होवुन आवश्यक साहित्याची गरज लक्षात घेवुन ते खरेदी करण्यात यावे असे ठरले.

ठराव क्रं.५ :- ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं.६ :- वार्षिक दिनदर्शिका (Annual calender) संबधी चर्चा करणे :-
महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष व्यवस्थित पणे कार्यान्वित करण्याकरिता विद्यापिठाचे ॲन्युअल कॅलेंडर तसेच महाविद्यालयाने तयार केलेले कॅलेन्डर सभेत चर्चेला ठेवण्यात आले त्यावर साधक-बाधक चर्चा करण्यात आली आणि त्याप्रमाणेच महाविद्यालयाचे कामाचे स्वरुप असावे यावर सर्व सदस्याचे एकमत झाले

ठराव क्रं.६ :- ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं.७ :- कॅफकल्टी प्लेसमेंट संबधी चर्चा करणे
चालु वर्षात पदोन्नतीसाठी पात्र प्राध्यापकांची पदोन्नती (वरिष्ठ श्रेणी) करुन घेण्यासाठी प्रस्ताव

तयार करणे, API तयार करणे विद्यापिठ व सहसंचालकांशी पत्र व्यवहार करणे इ. कामा-बद्दल सभेत चर्चा झाली व हीसर्व प्रक्रिया राबविण्याची जबाबदारी श्री चोरे यांना सोपविण्यात आली.

ठराव क्रं. ६:- ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं. ८:- मा. अध्यक्षाच्या अनुमतीने वेळेवर येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे :-

मा. अध्यक्षाच्या अनुमतीने वेळेवर उपस्थित केलेल्या विवीध विषयावर चर्चा करण्यात आली. मा. अध्यक्षांनी सर्व सदस्यांना मार्गदर्शन केले.

अध्यक्ष
President Secretay
Vidyabharti Sanstha,
Wardha.

सचिव
PRINCIPAL
Vidyabharti College, Seloo
Dr. R. G. Bhoyar Arts, Comm.
& Sci. College, SELOO

आज दिनांक २५।३।२०२२ रोजी दुपारी ४.०० वाजता महाविद्यालय विकास समितीची सभा संस्थेच्या कार्यालयात संपन्न झाली. सभेत खालील सभासद उपस्थित होते

1] डॉ. उमा. डी. भोयर — अध्यक्ष
2] डॉ. एम. एम. कानोडे — सचिव
3] डॉ. ए. की. वेलकर — सदस्य
4] डॉ. वी. पी. बोरसरे
5] डॉ. के. एन. पटाडे
6] डॉ. टही. एम. निकोसे
7] डॉ. ए. डी. टिपले
8] डॉ. एन. एन. पाटिल
9] श्री एम. यु. चोरे
10] श्री ए. डी. मेंढे
11] डॉ. एस. धानवटे
12] श्री विनय शिंडगा
13] श्री पराग ढोंडगे

PAGE No. DATE

विषय क्रं १ – मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे
समितीचे सचिव डॉ कानोडे यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचुन दाखविले त्यावर साधक-बाधक चर्चा होवून इतिवृत्ताला सर्व सभासदांनी मंजूरी दिली

ठराव क्रं. १ :– ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं. २ :– विवीध प्रशिक्षणाकरिता आर्थिक सहाय्य देण्याबाबत चर्चा करणे

महाविद्यालयातील प्राध्यापकांना conference, seminar, Refresher course, oriantation course, RDP, Short term course करण्याकरिता विवीध ठिकाणी जावे लागते आणि त्याकरिता खर्च होतो तो खर्च महाविद्यालयाने "आर्थिक सहाय्य" म्हणुन प्राध्यापकांना उपलब्ध करुन द्यावा असा प्रस्ताव डॉ पठाडे यांनी सभेत मांडला त्याला डॉ टिपले यांनी अनुमोदन दिले. सभेत या विषयावर चर्चा होवून सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

ठराव क्रं. २ – ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं. ३ :– तासिका तत्वावर प्राध्यापकांची नियुक्ती बाबत चर्चा करणे :–

विद्यार्थ्यांचे विषयानुसार workload आणि त्या विषयाकरिता नियुक्त प्राध्यापक यात तफावत असल्याने विषयवार तासिका तत्वावर प्राध्यापकांची नियुक्ती करणे आवश्यक आहे असा प्रस्ताव डॉ घैसास यांनी सभेत उपस्थित केला त्यावर चर्चा होवून सभेत सर्व सदस्याद्वारे मंजुरी देण्यात आली.

ठराव क्रं. ३ :– ठराव सर्वानुमते मंजूर

PAGE No. DATE

विषय क्रं. ४ :– महाविद्यालयाचे नॅक पुर्नमुल्यांकन करण्याबाबत चर्चा करणे.

महाविद्यालयाचे नॅक मुल्यांकन होवून निश्चित कालावधी पुर्ण होत आहे त्यामुळे महाविद्यालयाचे नॅक पुर्नमुल्यांकन करणे आवश्यक आहे असा प्रस्ताव डॉ टिपले यांनी सभेत सादर केला त्यावर चर्चा होवून नॅक पुर्नमुल्यांकनाला सर्व सभासदांद्वारे संमती देण्यात आली.

ठराव क्रं. ४ :– ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रं. ५ :– प्रयोगशाळा सहाय्यक कु. पारवे यांचा राजीनामा मंजूर करण्याबाबत :–

महाविद्यालयातील प्रयोगशाळा सहाय्यक कु शुभांगी आत्माराम पारवे यांनी त्यांच्या वैयक्तिक कारणावरुन पदाचा राजिनामा सादर केला आहे अशी माहीत डॉ कानोडे यांनी सभेला दिली यावर साधक-बाधक चर्चा होवून कु. पारवे यांचा राजिनामा मंजूर करुन त्यांना सेवामुक्त करावे असे सर्वानुमते मंजूर झाले.

ठराव क्रं. ५ :– ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं. ६ :– महाविद्यालय विकास समितीचा कार्यकाळ संपल्यामुळे नविन कमिटी गठीत करण्यावर चर्चा करणे :–

विद्यमान समितीची नेमणूक १ एप्रिल २०१८ रोजी ५ वर्षाकरिता करण्यात आली होती तो कार्यकाळ समाप्त होत आहे आता नविन समिती गठीत करणे आवश्यक आहे असे डॉ कानोडे यांनी सभेला निदर्शनास आणुन दिले त्यावर चर्चा होवू पुढील सदस्यांच्या नावाला सर्व सभासदांनी मान्यता दिली.
डॉ आर जी भोयर, डॉ ए व्ही वेकळकर, डॉ एस एस

कालोडे, डॉ. इरफान ए. खान, डॉ. एस. डी. नागदिवे, डॉ. के. पी. गणविर, डॉ. ए. डी. टिपले, डॉ. व्ही. बी. पिंपळे श्री एम. यु. चोरे, श्री वरुण दफ्तरी, डॉ. चंदु पोपटकर, श्री हेमंत नाईकवाडे, डॉ. आशिष ससनकर

ठराव क्रं. ६ :- ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रं. ७ :- माजी विद्यार्थी संघटनेच्या निधीचा महाविद्यालय विकासावर खर्च करण्यास मंजुरी देणे —

अॅल्युमिनी असोसिएशन मध्ये एकुण १७५ विद्यार्थी असुन त्यांचे कडुन आतापर्यंत १,६९,४५० रु. चा निधी संकलीत झाला आहे या निधीचा उपयोग महाविद्यालय विकास व उपकरणांवर खर्च करण्यात यावा असा प्रस्ताव सभेत चर्चेला आला असता त्यावर विस्तृतपणे चर्चा करण्यात आली व सर्वानुमते या निधीचा वापर महाविद्यालयावर खर्च करण्यात यावा याला सर्व सभासदांनी संमती दर्शविली

ठराव क्रं. ७ :- ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रं. ८ :- कोरी अंतर्गत घेण्यात येणाऱ्या उपक्रमांना मंजूरी देण्याबाबत चर्चा :-

जिल्ह्यातील १३ महाविद्यालयाच्या समुहातुन COII स्थापन करण्यात आली असुन या अंतर्गत विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी यांच्या दृष्टीने १४ प्रकारचे उपक्रम राबविण्यात आले त्या उपक्रमांअंतर्गत MOU करण्यात यावा असा प्रस्ताव सादर करण्यात आला यावर चर्चा होवुन COII सोबत MOU करण्यात यावा अशी सर्व सदस्यांनी संमती दिली व मार्गदर्शक मुद्दे निश्चित करण्यात आले

ठराव क्रं. ८ :- ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं. ९ :- अॅकेडेमिक व अॅडमिनिस्ट्रेशन ऑडीट करण्यास मंजुरी बद्दल चर्चा करणे

आय.क्यु.ए.सी. द्वारे AAA सर्व विभाग व समित्यांचे करणे आवश्यक आहे असा मुद्दा IQAC संयोजक डॉ. टिपले यांनी मांडला. सर्व विभाग व समित्यांचे AAA करण्याचे अधिकार IQAC ला असले पाहीजे असे करुन प्रत्येक विभागाचे ऑडीट व्यवस्थीत पणे करता येईल यावर सभेत चर्चा होवुन हे अधिकार IQAC ला देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रं. ९ :- ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रं. १० :- ICT अंतर्गत विविध कार्य करण्याबाबत मंजूरी घेण्याबाबत चर्चा करणे

कोविड-१९ या काळात प्रत्यक्ष पणे (offline) कार्य करणे कठिण झाल्यामुळे ICT द्वारे विद्यार्थ्यांना सोई देणे वर्गखोल्या वाढविणे, कॉन्फरंस हॉल, पदवीपूर्व प्रयोगशाळा आणि पदवीत्तर अभ्यासक्रमाअंतर्गत नविन वर्ग खोल्या स्थापन करणे आणि ICT माध्यमातुन विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणे काळाची गरज आहे त्यामुळे ICT ला महत्व देणे गरजेचे आहे यावर विस्तृत पणे चर्चा होवुन सर्व सभासदांनी संमती दर्शविली आणि मंजूरी दिली.

ठराव क्रं. १० :- ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रं. ११ :- नवीन अभ्यासक्रमाकरिता प्रस्ताव सादर करण्याबाबत —

विद्यार्थ्यांची मागणी लक्षात घेता P.G. अभ्यासक्रम MSc (Chemistry), MSc (Micro-Bio) आणि MBA महाविद्यालयात असणे आवश्यक आहे असा विषय डॉ. निकोसे यांनी चर्चेकरिता सभेत मांडला त्यावर विस्तृत चर्चा होवुन वरील सर्व

PAGE No.
DATE

अभ्यासक्रम सुरु करण्याकरिता प्रस्ताव सादर करण्याची जबाबदारी श्री चोरे यांच्यावर सोपविण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्र. ११ – ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र. १२ :– विद्यार्थ्यांना मोफत प्रवास सेवा यावर चर्चा करणे

महाविद्यालयातील प्रवेशीत बरेच विद्यार्थी बस ने येणे-जाणे करतात बस स्टॅंड ते महाविद्यालय अंतर जास्त असल्याने आणि वहातुकीचा रस्ता असल्याने बस स्टॅंड ते महाविद्यालयात येणे-जाणे करण्याकरिता स्टुडंड डेव्हलपमेंट सेल अंतर्गत मोफत ऑटो सुविधा उपलब्ध करण्यात यावी असे डॉ. पाटील यांनी सभेला सांगितले त्यावर चर्चा होवुन सर्वानुमते मोफत ऑटो ~~व्यस्थ~~ व्यवस्था करण्याचे ठरले

ठराव क्र. १२ – ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र. १३ – मा. अध्यक्षांच्या अनुमतीने वेळेवर येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे

मा. अध्यक्षांच्या अनुमतीने उपस्थित केलेल्या विविध विषयावर साधक-बाधक चर्चा घडुन आली व अध्यक्षांनी मार्गदर्शन केले.

ठराव क्र. १३ :– ठराव सर्वानुमते मंजूर

(signature) अध्यक्ष (डॉ. आर. जी. भोयर)
President / Secretay
Vidyabharti Sanstha,
Wardha.

VIDYABHARATI COLLEGE SELOO

(signature) सचिव (डॉ. एस. एस. कानोडे)
PRINCIPAL
Vidyabharati College, Seloo
Dr. R. G. Bhoyar Arts, Comm...

PAGE No.
DATE

आज दिनांक २२ जुलै २०२२ रोजी दुपारी ४.०० वाजता महाविद्यालय विकास समितीची सभा संस्थेच्या कार्यालयात संपन्न झाली. सभेत खालील सभासद उपस्थित होते

| | | |
|---|---|---|
| १] डॉ. आर. जी. भोयर | अध्यक्ष | (signature) |
| २] डॉ. एस. एस. कानोडे | सचिव | (signature) |
| ३] डॉ. ए. व्ही. वेकळकर | सदस्य | (signature) |
| ४] डॉ. डब्लु. ए. खान | | (signature) |
| ५] डॉ. एस. डी. नागदिवे | | (signature) |
| ६] डॉ. के. पी. गणविर | | (signature) |
| ७] डॉ. ए. डी. रिपले | | (signature) |
| ८] डॉ. व्ही. बी. पिंपळे | | (signature) |
| ९] श्री एम. यु. चोरे | | (signature) |
| १०] श्री वरुण दफ्तरी | | (signature) |
| ११] डॉ. चंदु पोपटकर | | (signature) |
| १२] श्री हेमंत नाईकवाडे | | (signature) |
| १३] डॉ. आशिष ससनकर | | (signature) |

विषय क्रं.१ :- मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे -

सचिव डॉ. कानोडे यांनी मागील सभेचे इतिवृत्ताचे वाचन केले त्यावर साधक-बाधक चर्चा होवून इतिवृत्ताला मान्यता देण्यात आली

ठराव क्रं.१ - ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं.२:- अंदाजपत्रक व अंकेक्षण अहवालावर चर्चा करणे

सभेत श्री चोरे यांनी अंदाजपत्रक सादर केले त्यावर चर्चा होवून काही सुधारणेसहीत मान्यता देण्यात आली तसेच मागील वर्षाचा अंकेक्षण अहवाल सादर केला त्यावर विस्तृत चर्चा होवून सर्वानुमते मान्यता देण्यात आली

ठराव क्रं.२ :- ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं.३:- नॅक संबधी AQR, SSR आणि NAAC Accreditation संबधी चर्चा करणे -

महाविद्यालयाचे पुर्नमुल्यांकन यावर्षी करावयाचे असल्याने 2021-22 चा AQR सादर करणे S.S.R सादर करणे यादृष्टीने वरील विषय सभेला सभेत आला असतांना IQAC संयोजक डॉ. टिपले व डॉ. पिंपळे यांनी सभेला माहीती सादर केली व कामाचा आराखडा सादर केला त्यावर सदस्यांनी आपले विचार सुचविले व AQR व SSR सादर करण्यासंबधी सुचना केल्या.

ठराव क्रं.३:- ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं.४:- फॅकल्टी प्लेसमेंट बद्दल चर्चा करणे -

चालु वर्षात पदोन्नतीसाठी पात्र प्राध्यापकांची पदोन्नती (वरिष्ठश्रेणी) करून घेण्यासाठी प्रस्ताव तयार करणे, API तयार करणे विद्यापिठ व सहसंचालक उच्च शिक्षण नागपूर यांच्याशी पत्रव्यवहार इ. विषय चर्चेला आला असता त्यावर चर्चा होवून संबधीत प्राध्यापकांना सुचना देणे तसेच पत्रव्यवहार करण्याची जबाबदारी सर्वानुमते श्री चोरे यांना सोपविण्याचे सर्वानुमते ठरले

ठराव क्रं.४ :- ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं.५:- घड्याळी तासिका तत्वावर प्राध्यापकांच्या नियुक्ती प्रस्ताव सादर करणे -

विषयानुसार कार्यभार लक्षात घेता तासिका तत्वावर प्राध्यापकांची नियुक्ती करणे आवश्यक आहे त्याकरिता प्रस्ताव सादर करणे, जाहिरात देणे, निवड झालेल्या उमेदवारांच्या Approval साठी पाठविण्याची प्रक्रिया राबविण्याचे सर्वानुमते ठरले आणि ही जबाबदारी श्री चोरे यांना सोपविण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रं.५ :- ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं.६:- एम.बी.ए. अभ्यासक्रमाकरिता इमारत बांधण्यासंबंधी चर्चा करणे -

एम.बी.ए. अभ्यासक्रमाकरिता प्रस्तावित इमारत पुरेशी नसल्यामुळे नविन इमारत बांधण्यात यावी असा विषय सभेत चर्चेला आला असता समितीचे अध्यक्ष डॉ. आर.जी. भोयर यांनी नविन इमारत प्रस्तावित आहे आणि बांधकाम सुरु होणार आहे असे सांगुन सर्व सभासदांना आश्वस्त केले.

ठराव क्रं.६ :- ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं. ६:- मा. अध्यक्षाच्या अनुमतीने वेळेवर उपस्थित होणाऱ्या विषयावर चर्चा करणे —

मा. अध्यक्षाच्याच्या अनुमतीने वेळेवर आलेल्या विविध विषयावर चर्चा झाली मा. अध्यक्षाद्वारे विविध विषयावर प्रकाश टाकण्यात आला.

ठराव क्रं. ६:- ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
(डॉ. आर. डी. भोयर)
President Secretay
Vidyabharti Sanstha,
Wardha.

सचिव
(डॉ. एस. एस. कानोडे)
PRINCIPAL
Vidyabharti College, Seloo
Dr. R. G. Bhoyar Arts, Comm,
& Sci. College, SELOO

---

आज दिनांक १४ मार्च २०२३ रोजी दुपारी ४.०० वाजता महाविद्यालय विकास समितीची सभा संस्थेच्या कार्यालयात संपन्न झाली. सभेला खालील सभासद उपस्थित होते.

1] डॉ. आर. डी. भोयर — अध्यक्ष
2] डॉ. एस. एस. कानोडे — सचिव
3] डॉ. ए. व्ही. वेकळकर — सदस्य
4] डॉ. डब्लू. ए. खान
5] डॉ. एस. डी. नागदिवे
6] डॉ. के. पी. गणविर
7] डॉ. ए. डी. टिपले
8] डॉ. व्ही. बी. पिंपळे
9] श्री. एम. यु. चोरे
10] श्री. वरुण दफ्तरी
11] डॉ. चंदू पोपटकर
12] श्री. हेमंत नाईकवाडे
13] डॉ. आशिष ससनकर

विषय क्र १ :- मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे —
डॉ कानोडे यांनी मागील सभेचे इतिवृत्त सभेत वाचुन दाखविले त्यावर साधक बाधक चर्चा होवुन इतिवृत्त कायम करण्यात आले.
ठराव क्र १ :- ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र २ :- नॅक करण्यासंबधी चर्चा करणे —
यावर्षी नॅक पुर्नमुल्यांकन करावयाचे असल्याने त्याकरिता IIQA तयार करुन सादर करण्याची प्रक्रिया राबविण्यात यावी असे सभेत सर्वानुमते ठरले तसेच IIQA ला मान्यता मिळाल्यानंतर SSR तयार करण्याची प्रक्रिया राबविण्यात यावी ~~बाबत~~ याविषयी सर्व सभासदांनी मान्यता दर्शविली आणि IQAC संयोजक डॉ टिपले आणि डॉ पिंपळे यांच्यावर जबाबदारी सोपविण्याचे सर्वानुमते ठरले तसेच नॅक करण्यासाठी होणाऱ्या खर्चाला मंजुरी देण्यात आली.
ठराव क्र २ :- ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र ३ :- ॲकेडमिक व ॲडमिनीस्ट्रेशन ऑडीट (AAA) शुल्क मंजूर करणे :-
नवीन सत्रापासुन Affiliation करिता ॲकेडमिक व ॲडमिनीस्ट्रेशन ऑडीट (AAA) विद्यापिठाकडे सादर करावयाचे आहे असे डॉ कानोडे यांनी सभेत सांगितले व AAA प्रस्तावासोबत निर्धारित शुल्क भरावयाचे ते शुल्क भरण्यासाठी सभासदांनी मंजुरी दयावी असा प्रस्ताव डॉ कानोडे यांनी सभेत मांडला त्यावर चर्चा होवुन सर्व सभासदांनी शुल्क भरण्याची मान्यता दिली.
ठराव क्र ३ :- ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र ४ :- महाविद्यालयात नविन प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत चर्चा करणे —

महाविद्यालयात या सत्रापासुन "Diploma in Vermiculture and Vermicomposting (one year)" हा अभ्यासक्रम सुरु करण्यात यावा असे डॉ गणविर यांनी सभेला सुचविले आणि अभ्यासक्रमाबद्दल संपूर्ण माहीती सादर केली त्यावर चर्चा होवुन सर्वानुमते वरील अभ्यासक्रम सुरु करण्यात यावा याला मंजुरी मिळाली त्यासोबतच ① English speaking course ② Tally ③ ~~Sericulture~~ Sericulture असे तिन अभ्यासक्रम देखील सुरु करण्याची परवानगी देण्यात आली आणि यासंबधीत विभाग प्रमुखांना जबाबदारी सोपविण्याचे सर्वानुमते ठरले
ठराव क्र ४ — ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रं ५ :- महाविद्यालयाचे ऑडीट करण्यासाठी मान्यता प्रदान करण्यासाठी चर्चा करणे.
महाविद्यालयाचे दरवर्षी आर्थिक स्थितीचे, जमा खर्चाचे ऑडीट करण्यात येते यावर्षी देखील ऑडीट करावे लागेल असे श्री चोरे यांनी सभेला सांगितले त्यावर सर्व सभासदांनी ऑडीट करण्याकरिता मान्यता प्रदान केली व सर्व जबाबदारी एकमताने श्री चोरे यांना सोपविण्यात आली
ठराव क्रं ५ :- ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं ६ मा. अध्यक्षांच्या अनुमतीने वेळेवर येणाऱ्या विषयावर चर्चा करणे —
सभेत विविध सभासदांनी विषय सभेत चर्चेकरिता मांडले त्यावर साधक-बाधक चर्चा घडवुन आणली तसेच सचिव यांनी वेगवेगळ्या अडचणी सभेत मांडल्या त्यावर माननिय अध्यक्ष डॉ उमार, श्री भोयर यांनी मार्गदर्शन केले तसेच संपूर्ण कार्यवाही योग्य पद्धतीने राबविण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन

केले आणि सर्व दृष्टीने संस्थेचे सहकार्य राहील याची ग्वाही दिली.

ठराव क्रं. ६ :- ठराव सर्वानुमते मंजूर.

अध्यक्ष
(डॉ आर जी भोयर)

President / Secretay
Vidyabharti Sanstha,
Wardha.

सचिव
(डॉ एस. एस कानोडे)

PRINCIPAL
Vidyabharti College, Seloo
Dr. R. G. Bhoyar Arts, Comm, & Sci. College, SELOO

Dr. R. G. Bhoyar Arts, Comm. & Sci. College, SELOO